शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
28 Jul 2024 - 5-A

# विद्यापीठात सायबर वॉरिअर क्लब स्थापन

**जळगाव । प्रतिनिधी**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्यातील सामंजस्य करारानुसार क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापन करण्यात आला आहे.

सायबर सुरक्षेच्या जनजागृती अंतर्गत स्थापन केलेल्या या क्लब मध्ये चार सदस्यांची नेमणुक करण्यात आली असून त्या मध्ये अध्यक्ष पायस सावळे, सेक्रेटरी मयुर बंडे, ॲक्टीव्हीटी डायरेक्टर रेवती फिरके, पीआर डायरेक्टर प्रगती कोल्हे व शिक्षक समन्वयक प्रा. राजु आमले व ३६ स्वयंसेवकची निवड करण्यात आली आहे. क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या सिनीयर एक्झीकेटीव्ह सुगंधा दानी यांनी या क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठच्या सर्व क्लब ऑफिसर्स व सदस्यांना दि १२ जुलै रोजी ऑनलाईन फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांबद्दल मार्गदर्शन केले.

तसेच शाळा महाविद्यालयातील विविध वयोगटातील विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधावा व समाजातील लोकांना सायबर गुन्ह्याबाबत जागृती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर पोलीस विभागातील सायबर सेलचे पीएसआय डिगंबर थोरात, हेड कॉन्स्टेबल दिलीप चिंचोले व पोलीस नाईक सचिन सोनवणे यांनी स्वयंसेवकांना समाजात कशा प्रकारे गुन्हे घडतात व त्यापासून कसे वाचावे व काय उपाय योजना कराव्या याबद्दल मार्गदर्शन केले.

तसेच फाऊंडेशनचे स्वयंसेवक जळगाव, धुळे, नंदुरबार येथे सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृती करणार आहेत.